एकलव्य चे प्रकाशन

# मी पण . . .

एक चित्रकथा



वी. सुतेयेव

# मी पण . . .

चित्र एवं कहानी
वी. सुतेयेव

एकलव्य
चे प्रकाशन

**मी पण . . .**

एक चित्रकथा

**चित्र आणि कहानी : वी. सुतेयेव**

**मराठी अनुवाद : सुधा हर्डीकर**

स्टोरीज़ एण्ड पिक्चर्स की एक चित्रकथा.
प्रगति प्रकाशन, मास्कोच्या सौजन्याने इंग्रजीतून अनुदित आणि प्रकाशित.

मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत शासन आणि
सर रतन टाटा ट्रस्टच्या वितीय सहयोगानी प्रकाशित.

जानेवरी, 2002/3000 प्रति
मूल्य रु. 10.00
हे पुस्तक हिन्दी, बंग्ला आणि इंग्रजीत सुध्दा उपलब्ध आहे.
एकूण 25 000 प्रति.



प्रकाशक

एकलव्य,
ई–7/453 एच. आई. जी., अरेरा कॉलोनी,
भोपाल – 462 016, म. प्र.
फोन : (0755) 463380, फैक्स : (0755) 461703
ईमेल : eklavyamp@vsnl.com

भंडारी ऑफसेट प्रिंटर्स, भोपाल द्वारा मुद्रित।

# मी पण . . .




एका अंड्यातून बदकाचं पिल्लू निघालं.

''पहा मी अंड्यातून बाहेर आलो.'' बदकाचं पिल्लू म्हणालं.



दुसऱ्या अंड्यातून कोंबडीचं पिल्लू बाहेर निघालं.
''मी पण बाहेर आलो.'' कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



''मी फिरायला जातो आहे.'' बदकाचं पिल्लू म्हणालं.

''मी पण येतो.'' कोंबडीचं पिल्लू म्हणालं.




‘‘मी खड्डा खोदतो आहे.’’ बदकाचं पिल्लू म्हणालं.

‘‘मी पण खोदेन.’’ कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



“हे पहा मला गांडूळ मिळालं.” बदकाचं पिल्लू म्हणालं.

“मला पण मिळालं.” कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



‘‘पहा मी फूलपाखरु पकडलं.’’ बदकाचं पिल्लू म्हणालं.
‘‘मी पण फूलपाखरु पकडलं.’’ कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



‘‘मी तलावात पोहायला जाणार आहे.’’ बदकाचं पिल्लू म्हणालं.

‘‘मी पण जाणार.’’ कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



''पहा मी कसा पोहतो आहे.'' बदकाचं पिल्लू म्हणालं.



‘‘मी पण पोहणार.’’ कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



‘‘वाचवा . . वाचवा . . ’’ कोंबडीचं पिल्लू ओरडलं.



बदकाच्या पिल्लानी कोंबडीच्या पिल्लाला
पाण्यातून बाहेर काढलं.



“मी पुन्हा पोहायला जाणार आहे.” बदकाचं पिल्लू म्हणालं.

“नको रे . . बाबा . . मी नाही जाणार पाण्यात.” कोंबडीचं पिल्लू म्हणालं.

मूल्य : रु. 10.00